RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ८(३)] गुरुवार, जानेवारी १२, २०१७/पौष २२, शके १९३८ [पृष्ठे ८, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक १४

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.—महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. . . | १-८ |


दिनांक १० जानेवारी २०१७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रकाश हिं. माळी,<br>
प्रधान सचिव,<br>
महाराष्ट्र शासन,<br>
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १२ जानेवारी २०१७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

२०१६ चा महा. अध्या. १. ज्याअर्थी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६, हा, दिनांक १९ मे २०१६ रोजी प्रख्यापित केला होता ;

आणि ज्याअर्थी, दिनांक १८ जुलै २०१६ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१६, (सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६) हे, महाराष्ट्र विधानसभेने दिनांक २६ जुलै २०१६, रोजी संमत केले होते आणि महाराष्ट्र विधानपरिषदेकडे ते पारेषित करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, त्यानंतर महाराष्ट्र विधानपरिषेदेची दिनांक ५ ऑगस्ट २०१६ रोजी सत्र समाप्ती झाल्यामुळे महाराष्ट्र विधानपरिषदेत उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरु झाल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यानंतर म्हणजेच, २८ ऑगस्ट २०१६ या दिनांकानंतर, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२)(क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद झाले असते ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाचे अधिवेशन चालू नव्हते आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ३० ऑगस्ट २०१६ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "पुढे चालू ठेवणे अध्यादेश" असा करण्यात आला आहे) हा प्रख्यापित केला होता ; २०१६ चा महा. अध्या. १६.

आणि ज्याअर्थी, उक्त पुढे चालू ठेवणे अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१६ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १९ मे २०१६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण दोन

## महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम याची सुधारणा

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ची सुधारणा. २. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम याच्या कलम ५ च्या पोट-कलम (३) मध्ये,— १९४९ चा ५९.

(क) पहिल्या परंतुकापूर्वी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

"परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१६ याच्या प्रारंभानंतर, महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर चार पालिका सदस्य, परंतु, तीन पेक्षा कमी नाहीत व पाच पेक्षा अधिक नाहीत एवढे पालिका सदस्य, निवडून देण्यात येतील, आणि या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक मतदाराला, त्याच्या प्रभागातील निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येइतकी मते देण्याचा हक्क असेल :" ; २०१७ चा महा. १.

(ख) पहिल्या परंतुकामध्ये, "परंतु," या मजकुराऐवजी, "परंतु आणखी असे की, " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## प्रकरण तीन

## महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याची सुधारणा.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम २ ची सुधारणा. ३. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश "नगरपरिषदा अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मधील,— १९६५ चा महा. ४०.

(क) खंड (७) मध्ये,—

(एक) "परिषदेचा सदस्य" या मजकुरानंतर, ", थेट निवडून आलेला अध्यक्ष" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) उपखंड (दोन) मधील, "परिषदेचा अध्यक्ष म्हणून किंवा" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) खंड (१२) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(१२) "निवडणूक" याचा अर्थ, परिषदेची किंवा, यथास्थिति, अध्यक्षाच्या पदाची निवडणूक, असा आहे, आणि त्यात कोणत्याही पोट निवडणुकीचा समावेश होतो ;".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ९ ची सुधारणा.

४. नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ९ मधील, पोट-कलम (१) च्या खंड (अ) मध्ये, "परिषद सदस्य ;" या मजकुराऐवजी, "अध्यक्ष व परिषद सदस्य ; " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १० ची सुधारणा.

५. नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम १० मधील, पोट-कलम (२) मध्ये, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

२०१७ चा महा. १.

"परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१६ याच्या प्रारंभानंतर, नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, प्रत्येक प्रभागातून शक्य असेल तेथवर दोन परिषद सदस्य, परंतु तीन पेक्षा अधिक नाहीत एवढे परिषद सदस्य निवडून देण्यात येतील, आणि कलम १४ च्या पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक मतदाराला, त्याच्या प्रभागातील निवडून द्यावयाच्या परिषद सदस्यांच्या संख्येइतकी मते देण्याचा हक्क असेल.".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये कलम ५१ अ-१अ समाविष्ट करणे.

६. नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ५१ नंतर, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

२०१७ चा महा. १.

अध्यक्षाची थेट निवडणूक.

"५१ अ-१अ. (१) महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनिम, २०१६ याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर, नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, कलम ५१-१अ च्या तरतुदींना अधीन राहून, प्रत्येक नगरपरिषदेचा एक अध्यक्ष असेल व तो कलम ११ अन्वये तयार केलेल्या नगरपालिका मतदारांच्या यादीमध्ये ज्यांची नावे समाविष्ट केली असतील, अशा व्यक्तींकडून निवडण्यात येईल.

(२) कलम १५ अन्वये परिषद सदस्य म्हणून निवडून येण्यास अर्ह असणारी प्रत्येक व्यक्ती निवडणुकीत अध्यक्ष म्हणून निवडून येण्यास अर्ह असेल.

(३) अध्यक्षाची निवडणूक परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीबरोबर एकाच वेळी घेण्यात येईल आणि परिषदेच्या निवडणुका घेण्यासंबंधातील कार्यपद्धती अशा निवडणुकीस, योग्य त्या फेरफारांसह, लागू होईल.

(४) जर निवडणुकीच्या वेळी अध्यक्ष निवडण्यात आला नाही तर, अध्यक्ष निवडण्यासाठी नव्याने निवडणूक घेण्यात येईल आणि जर नव्याने घेतलेल्या निवडणुकीत अध्यक्ष निवडून दिला नाही तर, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, अशी रिक्त जागा, निवडून आलेल्या परिषद सदस्यांद्वारे त्यांच्यामधून निवडणुकीद्वारे भरण्यात येईल.

(५) पोट-कलम (४) किंवा (७) अन्वये निवडून आलेली कोणतीही व्यक्ती या कलमान्वये निवडणुकीत यथोचितरीत्या निवडून आली असल्याचे मानण्यात येईल.

(६) अध्यक्षाच्या निवडणुकीत, समसमान मते पडली तर, निवडणुकीचा निकाल राज्य निवडणूक आयुक्ताकडून किंवा, त्या प्रयोजनार्थ त्याच्याकडून नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याद्वारे चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्यात येईल.

(७) निवडून आलेल्या परिषद सदस्यांच्या मुदतीत, अध्यक्षाचे पद कोणत्याही कारणामुळे रिक्त झाले असेल तर, त्याबाबतीत, पोट-कलमे (१) ते (६) यांमध्ये तरतूद केलेली कार्यपद्धतीच लागू होईल, आणि असा अध्यक्ष, असे पद रिक्त झाले नसते तर त्याचा पूर्वाधिकारी अशा नैमित्तिक रिक्त पदावर जेवढ्या मुदतीकरिता राहिला असता तेवढ्याच उर्वरित मुदतीकरिता अध्यक्ष असेल :

परंतु, निवडून आलेल्या परिषद सदस्यांचा पदावधी ज्या दिनांकास समाप्त होत असेल त्या दिनांकापूर्वी सहा महिन्यांच्या आत पद रिक्त झाले तर ते पद, निवडून आलेल्या परिषद सदस्यांद्वारे त्यांच्यामधून निवडणुकीद्वारे भरण्यात येईल.

(८) अध्यक्षाच्या निवडणुकीसंबंधात कोणताही वाद निर्माण झाल्यास, त्याबाबतीत कलम २१ च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

(९) जिल्हाधिकारी, परिषदेची आणि अध्यक्षाची सार्वत्रिक निवडणूक झाल्यानंतर, अध्यक्षाचे नाव व निवडून आलेल्या परिषद सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून पंचवीस दिवसांच्या आत नगरपरिषदेची पहिली सर्वसाधारण सभा बोलावील. या सभेमध्ये कलम ९ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) अन्वये, परिषद सदस्यांचे नामनिर्देशन विहित रीतीने करण्यात येईल.".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१अ ची सुधारणा.

७. नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ५१अ मध्ये पोट-कलम (६) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(६अ) महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१६ याच्या प्रारंभानंतर ज्या परिषदांचे अध्यक्ष थेट निवडलेले असतील त्या परिषदांच्या बाबतीत, या कलमाच्या तरतुदी पुढील फेरबदलांसह लागू असतील :— २०१७ चा महा. ९.

(एक) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१) प्रत्येक नगरपरिषदेचा एक उपाध्यक्ष असेल व तो कलम ५१अ-१अ च्या पोट-कलम (९) अन्वये बोलाविण्यात आलेल्या पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये, निवडून आलेल्या परिषद सदस्यांद्वारे त्यांच्यामधून निवडून दिला जाईल." ;

(दोन) पोट-कलम (६) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(६) कलम ५५अ च्या तरतुदींना व या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, उपाध्यक्ष, तो निवडून आल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील आणि त्याची मुदत परिषदेच्या मुदतीबरोबरच समाप्त होईल.".".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१ब ची सुधारणा.

८. नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ५१ब मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(४) या कलमाच्या तरतुदी, कलम ५१अ-१अ अन्वये निवडून आलेल्या अध्यक्षास लागू होणार नाहीत.".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५२ ची सुधारणा.

९. नगरपरिषदा अधिनियमाचे कलम ५२ याला, त्याचे पोट-कलम (१) म्हणून नवीन क्रमांक देण्यात येईल आणि असा नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :—

"(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ५१अ-१अ च्या पोट-कलम (१) अन्वये निवडून दिलेल्या अध्यक्षाच्या पदाची मुदत पाच वर्षांची असेल आणि ती परिषदेच्या मुदतीबरोबरच समाप्त होईल.

(३) महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०१६ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी ज्या नगरपरिषदांच्या बाबतीत सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या असतील अशा नगरपरिषदांच्या संबंधात जे अध्यक्ष पद धारण करीत असतील अशा अध्यक्षांच्या पदाच्या मुदतीस पोट-कलम (२) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही आणि या कलमाच्या तरतुदी ह्या अशा प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास अस्तित्वात असल्याप्रमाणे अशा अध्यक्षांच्या पदाच्या मुदतीच्या संबंधात लागू असण्याचे चालू राहील.". २०१७ चा महा. ९.

१०. नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ५५ मध्ये, पोट-कलम (१) मधील परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५५ ची सुधारणा.

"परंतु, थेट निवडून आलेल्या अध्यक्षाच्या बाबतीत तो निवडून आल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीत आणि परिषद सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेल्या अध्यक्षाच्या बाबतीत अशा निवडीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत, असा कोणताही ठराव आणता येणार नाही.".

११. नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ३४१ब नंतर, पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये कलमे ३४१ब-१ ते ३४१ब-६ समाविष्ट करणे.

नगरपंचायतीच्या अध्यक्षाची निवडणूक.

"३४१ब-१. (१) कलम ५१-१अ च्या तरतुदींस अधीन राहून, प्रत्येक नगरपंचायतीचा एक अध्यक्ष असेल व तो, निवडून आलेल्या पंचायत सदस्यांद्वारे त्यांच्यामधून निवडण्यात येईल.

(२) नगरपंचायतीवर निवडून आलेल्या पंचायत सदस्यांची नावे कलम १९ च्या पोट-कलम (१) अन्वये, राजपत्रात, ज्या दिनांकास प्रसिद्ध करण्यात येतील किंवा, यथास्थिति, प्रथम प्रसिद्ध करण्यात येतील, त्या दिनांकापासून पंचवीस दिवसांच्या आत, जिल्हाधिकारी, अध्यक्षाला निवडून देण्यासाठी पंचायत सदस्यांची एक विशेष सभा बोलावील :

परंतु, या कलमाखालील अशी सभा, मावळत्या पंचायत सदस्यांची मुदत संपण्यापूर्वी घेता येणार नाही.

(३) पोट-कलम (२) अन्वये बोलावण्यात आलेल्या सभेच्या अध्यक्षपदी जिल्हाधिकारी किंवा याबाबत जिल्हाधिकारी लेखी आदेशाद्वारे नेमील असा अधिकारी असेल. जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी जेव्हा अशा सभेच्या अध्यक्षपदी असेल तेव्हा, त्याला, नगरपंचायतीच्या अध्यक्षाला नगरपंचायतीच्या सभेच्या अध्यक्षपदी असताना जे अधिकार असतात तेच अधिकार असतील, परंतु त्यास मतदानाचा हक्क असणार नाही :

परंतु, सभेतील कार्यपद्धतीचे (सभेसाठी आवश्यक असणाऱ्या गणपूर्तीसह) विनियमन करण्यासाठी या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा सभेच्या अध्यक्षपदी असणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास त्याच्या मते पुरेशी असतील अशा कारणांवरून, अशी सभा स्थगित करण्यास नकार देता येईल.

(४) कोणतेही नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यासंबंधीच्या किंवा नाकारण्यासंबंधीच्या जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा अशा अधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही पंचायत सदस्यास, असा निर्णय कळविल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत, संबंधित प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन याच्याकडे अपील सादर करता येईल आणि त्याचवेळी त्यास, अशा अपिलाची नोटीस जिल्हाधिकाऱ्याला किंवा अशा अधिकाऱ्याला देता येईल. संबंधित पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, प्रादेशिक संचालक शक्य तितक्या शीघ्रतेने असे अपील निकालात काढील. अशा अपिलावरील प्रादेशिक संचालकाच्या निर्णयास, आणि केवळ अशा निर्णयास (कोणताही असल्यास) अधीन राहून नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यासंबंधीच्या किंवा नाकारण्यासंबंधीच्या जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा, यथास्थिति, अशा अधिकाऱ्याच्या, निर्णयास कोणत्याही न्यायालयात हरकत घेण्यात येणार नाही.

(५) जर अध्यक्षाच्या निवडणुकीत समसमान मते पडली तर, त्या निवडणुकीचा निकाल जिल्हाधिकारी किंवा पीठासीन अधिकारी निर्धारित करील अशा रीतीने, त्याच्या समक्ष चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्यात येईल.

(६) अध्यक्षाच्या निवडणुकीबाबतचा कोणताही वाद राज्य शासनाकडे निर्णयार्थ पाठवण्यात येईल व त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

(७) अध्यक्षाच्या निवडणुकीनंतर, उपाध्यक्षाची निवड करण्यासाठी नगरपंचायत आपली सभा चालू ठेवील.

(८) जर अध्यक्षाचे पद कोणत्याही कारणाने रिक्त झाले असेल तर, अध्यक्षाच्या नंतरच्या निवडणुकीकरिता, पोट-कलमे (२) ते (६) (दोन्ही धरून) यात ठरवून दिलेली कार्यपद्धती लागू होईल, मात्र पद रिक्त झाल्याच्या दिनांकापासून पंचवीस दिवसांच्या आत, जिल्हाधिकारी विशेष सभा बोलावील.

(९) पोट-कलम (२) च्या तरतुदींन्वये निवडून दिलेल्या अध्यक्षाचा अडीच वर्षांचा पहिला पदावधी समाप्त झाल्यानंतर अध्यक्षाच्या पदाची नंतरची निवडणूक, आधीच्या अध्यक्षाचा उक्त पदावधी समाप्त होण्याअगोदरच्या आठ दिवसांच्या कालावधीच्या आत घेण्यात येईल :

परंतु, नव्याने निवडून आलेला अध्यक्ष मावळत्या अध्यक्षाचा पदावधी समाप्त होण्याच्या अखेरच्या दिवशी किंवा नंतरच्या दिवशी, कार्यभार स्वीकारील.

नगरपंचायतीच्या उपाध्यक्षाची निवडणूक.

**३४१ब-२.** (१) प्रत्येक नगरपंचायतीचा एक उपाध्यक्ष असेल, व तो कलम ३४१ब-१ च्या पोट-कलम (२) अन्वये बोलविण्यात आलेल्या पहिल्या सर्वसाधारण सभेमध्ये, निवडून आलेल्या पंचायत सदस्यांद्वारे त्यांच्यामधून निवडून दिला जाईल.

(२) उपाध्यक्षाची निवड करण्याच्या सभेमध्ये जिल्हाधिकारी किंवा याबाबत जिल्हाधिकारी विशेषकरून नामनिर्देशित करील असा इतर अधिकारी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारील, परंतु, जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अधिकाऱ्यास मत देण्याचा अधिकार असणार नाही :

परंतु, सभेची कार्यपद्धती (तिच्या गणपूर्तीसह) विनियमित करण्यासाठी या अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या नियमांत काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकाऱ्यास किंवा, यथास्थिति, अशा सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारणाऱ्या अधिकाऱ्यास पुरेशी कारणे लेखी नोंदवून, अशी सभा स्थगित करण्यास नकार देता येईल.

(३) उपाध्यक्षाच्या निवडणुकीत समसमान मते पडली तर, त्या निवडणुकीचा निकाल अशा सभेच्या अध्यक्षस्थानी असलेल्या अधिकाऱ्याकडून चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरवण्यात येईल.

(४) जिल्हाधिकारी, अशा रीतीने निवडून आलेल्या उपाध्यक्षाचे नाव, अशा निवडणुकीपासून पंधरा दिवसांच्या आत राजपत्रात अधिसूचित करील.

(५) उपाध्यक्षाच्या निवडणुकीसंबंधीचा कोणताही वाद राज्य शासनाकडे निर्णयार्थ पाठविण्यात येईल आणि त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

(६) कलम ५५अ च्या तरतुदींना व या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, उपाध्यक्ष, तो निवडून आल्याच्या दिनांकापासून अडीच वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील.

(७) उपाध्यक्षाचे पद, कोणत्याही कारणामुळे रिक्त झाले असेल तर, ते रिक्त पद पोट-कलमे (१) ते (३) मध्ये ठरवून दिलेली कार्यपद्धती अनुसरून भरण्यात येईल आणि अशा रीतीने निवडून आलेला उपाध्यक्ष, असे पद रिक्त झाले नसते तर त्याचा पूर्वाधिकारी अशा नैमित्तिक रिक्त पदावर जेवढ्या मुदतीकरिता राहिला असता तेवढ्याच उर्वरित मुदतीकरिता उपाध्यक्ष असेल.

नगरपंचायतीच्या पंचायत सदस्यांचे नामनिर्देशन.

**३४१ब-३.** (१) जिल्हाधिकारी, अध्यक्ष निवडून आल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत पंचायत सदस्यांचे नामनिर्देशन करण्याच्या प्रयोजनासाठी एक विशेष सभा बोलावील.

(२) कलम ९ च्या पोट-कलम (१) च्या, खंड (ब) अन्वये करावयाचे परिषद सदस्यांचे नामनिर्देशन, विहित रीतीने करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये बोलावण्यात आलेल्या सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी किंवा याबाबत जिल्हाधिकारी लेखी आदेशाद्वारे नेमील असा अधिकारी असेल. जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी जेव्हा अशा सभेच्या अध्यक्षस्थानी असेल तेव्हा, त्यास, नगरपंचायतीच्या अध्यक्षाला, नगरपंचायतीच्या सभेच्या अध्यक्षस्थानी असताना जे अधिकार असतात तेच अधिकार असतील, परंतु त्यास मतदानाचा हक्क असणार नाही :

परंतु, सभेतील कार्यपद्धतीचे (सभेसाठी आवश्यक असणाऱ्या गणपूर्तीसह) विनियमन करण्यासाठी या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा सभेच्या अध्यक्षस्थानी असणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास त्याच्या मते पुरेशी असतील अशा कारणांवरून अशी सभा स्थगित करण्यास नकार देता येईल.

**३४१ब-४.** नगरपंचायतीच्या अध्यक्षाच्या पदाची मुदत ही अडीच वर्षांची असेल. नगरपंचायतीच्या अध्यक्षाच्या पदाची मुदत.

**३४१ब-५.** (१) पंचायत सदस्यांनी विशेष सभेत एकूण पंचायत सदस्यांपैकी कमीतकमी तीन-चतुर्थांश इतक्या बहुमताने संमत केलेल्या ठरावाद्वारे तसा निर्णय केला तर, नगरपंचायतीचा अध्यक्ष हा, अध्यक्ष असण्याचे बंद होईल : पंचायत सदस्यांनी नगरपंचायतीच्या अध्यक्षास काढून टाकणे.

परंतु, अध्यक्षाच्या निवडणुकीच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीच्या आत असा कोणताही ठराव मांडता येणार नाही.

(२) अशी विशेष सभा बोलावण्याच्या मागणीपत्रावर एकूण पंचायत सदस्यांपैकी कमीतकमी निम्म्या पंचायत सदस्यांनी सही केलेली असेल आणि ते जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल.

(३) जिल्हाधिकारी, पोट-कलम (२) खालील मागणीपत्र मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत, पंचायतीची एक विशेष सभा बोलावील :

परंतु, जेव्हा जिल्हाधिकारी विशेष सभा बोलावील तेव्हा, तो त्याबाबत अध्यक्षाला कळवील.

(४) पोट-कलम (१) खालील ठरावावर विचार करण्यासाठी बोलाविलेल्या सभेचे अध्यक्षस्थान जिल्हाधिकारी किंवा त्याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी स्वीकारील. परंतु, जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अन्य अधिकाऱ्यास मतदानाचा हक्क असणार नाही.

(५) नामनिर्देशित पंचायत सदस्यांना अध्यक्षास काढून टाकण्याबाबतच्या कोणत्याही ठरावावर मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

(६) जर पोट-कलम (३) खालील प्रयोजनार्थ बोलाविलेल्या विशेष सभेमध्ये अध्यक्षाला काढून टाकण्याची मागणी करणारा ठराव मांडण्यात आला नसेल किंवा, यथास्थिति, तो फेटाळण्यात आला असेल तर, अध्यक्षाला काढून टाकण्याची मागणी करणारा कोणताही नवीन ठराव त्या नगरपंचायतीपुढे मांडण्यात येणार नाही.

**३४१ब-६.** (१) नगरपंचायतीने विशेष सभेत एकूण पंचायत सदस्यांपैकी कमीतकमी दोन-तृतीयांश इतक्या बहुमताने संमत केलेल्या ठरावाद्वारे तसा निर्णय केला तर, उपाध्यक्ष हा, उपाध्यक्ष असण्याचे बंद होईल : पंचायत सदस्यांनी नगरपंचायतीच्या उपाध्यक्षास काढून टाकणे.

परंतु, उपाध्यक्षाच्या निवडणुकीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत असा कोणताही ठराव मांडण्यात येणार नाही.

(२) अशी विशेष सभा बोलाविण्याच्या मागणीपत्रावर एकूण पंचायत सदस्यांपैकी कमीत कमी निम्म्या पंचायत सदस्यांनी सही केलेली असेल आणि ते अध्यक्षाकडे पाठविण्यात येईल आणि अध्यक्ष, असे मागणीपत्र मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत, नगरपंचायतीची एक विशेष सभा बोलावील, त्यात नामनिर्देशित पंचायत सदस्यांना मतदानाचा हक्क असणार नाही.

(३) जर पोट-कलम (२) खालील प्रयोजनार्थ बोलाविलेल्या विशेष सभेमध्ये उपाध्यक्षाला काढून टाकण्याची मागणी करणारा ठराव मांडण्यात आला नसेल किंवा, यथास्थिति, तो फेटाळण्यात आला असेल तर, अशा उपाध्यक्षाच्या पदावधीमध्ये अशा प्रकारे काढून टाकण्याबाबतचा कोणताही नवीन ठराव मांडण्यात येणार नाही.".

## प्रकरण चार

## संकीर्ण

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

१२. (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, किंवा, यथास्थिति, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, परंतु या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त अधिनियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे निदेश, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे देता येतील : १९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला कोणताही आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येईल.

सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६ याचे निरसन व व्यावृत्ती.

१३. (१) महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१६ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०१६ चा महा. अध्या. १६.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या व नगरपरिषदा अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या उक्त अधिनियमांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल. १९४९ चा ५९.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.